# दैनंदिन गुन्हे अहवाल

दिनांक -२६/०७/२०२०

१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | अप.क्र.६७७/२०२० कलम २७९, ३३७, ३३८,२७० भा.द.वि. सहकलम ५१(ब) रा.आ.व्य.का. सन २००५ अन्वये |
| फिर्यादि नाव व पत्ता | सलीम घोरी मखमुद्दीन घोरी वय ४५ वर्ष. धंदा-वर्कशॉप रा.साबनपुरा अमरावती. |
| घटनास्थळ | चपराशीपुरा मज्जीद चौक अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि.२५.०७.२०२० चे ११.१५ वा |
| दाखल ता. वेळ | दि.२५.०७.२०२० चे १३.१८ वा |
| आरोपी | स्कॉर्पीओ गाडी क्र.एम.च -३०-एटी-१६९९ चा चालक |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व त्याचा जखमी मित्र नामे शहजाद उर्पे शज्जु अहमद अली रा.साबनपुरा अमरावती. याच्यासह त्याची बजाज सी.टी १०० गाडी क्र.एम.एच -२७ वाय-६६०९ वरुन त्यांचा मित्राच्या घरी जात असताना नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी स्कॉर्पीओ गाडी क्र.एम.च -३०-एटी-१६९९ चा चालक आरोपी याने त्याची गाडी बेदरकारपणे चालवुन फिर्यादीस व त्याच्या मित्रास ठोस मारुन गंभीर जखमी केले.तसेच सद्या कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता अम.शहर हद्दीत मा. जिल्हाधिकारी सा.यांचा आदेश क्र. कक्ष २७ /कलि /गृह / विभआग /कावि-३७७/२०२० दि. ०६.०७.२०२० अन्वये जारी असलेलया आदेशाचे उल्लंघ केले .अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउप.नि. लेवटकर पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर. |

२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६७८/२०२० कलम ३५४, ३५४(अ), ३५४(ड), ३४१, ५०६ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १४.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १७.५२ वा. |
| आरोपी | मोहम्मद अब्रार उल्हक , वय २८ वर्ष, रा. पॅराडाईज कॉलनी, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हि आरोपी सन २०११ पासुन ओळखते व फक्त ओळखिचा व्यक्ती म्हणुन बोलत होती. परंतु आरोपी ने फिर्यादीला वेगळया नजरेने पाहून तिच्या घराभोवती चक्करा मारुन फि. हि घराबाहेर आली कि, फिर्यादीला अडवून तिचा हात पकडुन , माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणायचा. म्हणुन फि. ने झालेला प्रकार तिचा भाऊ यास सांगितले व त्याने आरोपीस समजावुन सांगितले वरुन आरोपीने सन २०१८ पर्यंत फि. ला त्रास दिला नाही. सन २०१८ मध्ये फिर्यादी बँगलोर ला असतांना आरोपीने फिर्यादीला अननोन नंबरवरुन फोन करुन म्हटले कि, मी तुला अजुनही विसरलो नाही. माझे तुझ्यावर खुप प्रेम आहे. तु जर माझ्याशी बोलली नाही तर मी स्वताचे बरेवाईट करुन घेईन . वरुन फिर्यादी घाबरुन आरोपीसोबत बोलु लागली. तेव्हा फेब्रुवारी २०२० मध्ये फि. चे लग्न ठरले वरुन फिर्यादी हि मार्च २०२० मध्ये बँगलोर मधुन अमरावती ला आली असता आरोपीने फिर्यादीस वारंवार फोन करुन फिर्यादीला लग्न करण्यास फोर्स करुन लागला व शारीरिक सुखाची मागणी करु लागला. तेव्हा फिर्यादीने आरोपीला म्हटले कि, माझे लग्न ठरले आहे तु माझ्या मागे लागणे सोडुन दे. हे एकुन आरोपीने फिर्यादीच्या भावाला फोन करुन स्वताचे बरेवाईट करण्याची धमकी दिली. व फि.चे लग्न ठरल्याचे माहिती काढून फोन करुन माझे प्रेमसंबंध आहे असे सांगीतले व म्हटले कि, तु जर तिचेसोबत लग्न केले तर मी तिच्या तोंडावर अँसिड टाकून विद्रुप करुन टाकेल. अशी धमकी दिली. व फि. चे लग्न मोडले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८०/२०२० कलम ३२४, ५०४ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | राहुल बाबुलाल वानखडे , वय ३८ वर्ष, धंदा मजुरी, रा. संजय गांधी नगर नं. २, अमरावती. ह. मु. वैभव राहुल रायबोले यांचे घरी यशोदा नगर नं. २, गल्ली नं. ४, अमरावती. |
| घटनास्थळ | संजय गांधी नगर नं. २, छोटु जामगडे यांचे राहते घरी, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १४.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७. २०२० चे १९.४३ वा. |
| आरोपी | छोटु जामगडे रा. संजय गांधी नगर नं. २, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील आरोपी व फिर्यादी हे एकाच मोहल्यात राहत असुन मागील एक वर्षापुर्व ते दोघेही सोबतच कामाला जात होते. तेव्हा आरोपीने फी. चे कामाचे दोन हजार रु. दिले नव्हते . जेव्हा जेव्हा फि. ने पैशाची मागणी केली तेव्हा तेव्हा आरोपीने टाळाटाळ केली. यातील नमुद घटना ता वेळी व ठिकामी फिर्यादीने आरोपीचे राहते घराजवळ जाऊन आवाज दिला असता आरोपी हा बाहेर आला. वरुन फि. ने आरोपीस दोन हजार रु. ची मागणी केली. असता आरोपीने फि.ला शिवीगाळ करुन थापडाबुक्यांनी मारहाण केली. व फि.च्या उजव्या कानाला चावा घेतला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन व मेडीकल सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८३/२०२० कलम ३२४, ५०४, ५०६ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | हरिदास रतन राठोड, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. परसोडा २ नंबर वार्ड, अमरावती. |
| घटनास्थळ | फि. चे घरासमोर परसोडा, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १७.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे २०.५४ वा. |
| आरोपी | गोविंद बबनराव राठोड, वय २६ वर्ष, रा. परसोडा, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे शेजारी शेजारी रहात असुन शुल्क कारणावरुन आरोपी हे फि. सोबत भांडण करीत असतो. यातील नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी आरोपी हा दारु पिऊन आला व फि. ला शिवीगाळ करुन तुला मारतो असे म्हटले, वरुन फि. ने आरोपीस विचारले कि, मी तुझे काय बिघडविले आहे जर बिघडविले तर तु मला मार असे म्हटले असता आरोपी ने त्याचे जवळची काठी फि. चे उजव्या हाताच्या मनगटावर व पायवर तसेच डोक्यावर जोरात मारले व म्हणाला कि, माझा जर रिपोर्ट करशील तर सोडणार नाही. अशी धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८४/२०२० कलम १८८, २६९, २७१ भा. द. वि. सहकलम ५१(ब) रा. आ. व्य. का. २००५ सहकलम १५८/१७७ मो. वा. का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे पो. उपनि दत्तात्रय गंगाधर मंठाळे, वय ३९ वर्ष, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |
| घटनास्थळ | यशोदा नगर चौक, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १७.१५ वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे २१.४० वा. |
| आरोपी | आकाश जालिंदर माने वय २७ वर्ष, रा. कुंभारवाडा, फ्रेजरपुरा, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, महाराष्ट्रामध्ये तसेच अमरावती जिल्ह्यात कोरोना विषाणुपासुन होणारे साथ रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने एक प्रतिबंधक उपाय म्हणून मा. जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे आदेश क्र. २७/कलि/गृहविभाग/कावि- ३७७/२०२० दि. ०६.०७.२०२० अन्वये अमरावती शहरामध्ये व जिल्हामध्ये कलम १४४(१)(२) (३) जा. फौ. नुसार दर शुक्रवारी सायंकाळी ०७.०० वा ते |

| | |
|---|---|
| | सोमवारी सकाळी ०७.०० वा. पावेतो संचारबंदी लागु केली आहे. त्या अनुषंगाने फिर्यादी हे पो. स्टे.स्टॉफसह यशोदा नगर चौक येथे नाकाबंदी बंदोबस्तकरीता हजर असतांना यातील नमुद आरोपी हा त्याचे वहान होडा युनिकॉर्न मो. सा. क्र. एम. एच. २७ ए. एस. १७०१ ने तोंडाला मास्क न लावता विनाकारण फिरतांना मिळुन आला. असुन त्यास रस्त्यावर फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवा उडविचे उत्तर दिले. त्याचे ताब्यातील होडा युनिकॉर्न मो. सा. क्र. एम. एच. २७ ए. एस. १७०१ कि. अं. ४०,०००/- रु. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आली. व नमुद आरोपी चे कृत्य मा. जिल्हाधीकारी अमरावती यांचे आदेशाचा भंग केला म्हणुन सदर आरोपीचे कृत्य हे कलम कलम १८८ भा. द. वि. सहकलम ५१(ब) रा. आ. व्य. का. २००५ सहकलम १५८/१७७ मो. वा. का. नुसार होत असल्याने. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. ( पो. सटे.चे इतर गुन्हे दाखल करणे सुरु असल्याने सदर गुन्हा दाखल होण्यास विलंब झाला. ) |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती |

६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ६२२/२०२० कलम १८८ भादवि सहकलम २,३,४ साथीचे रोग अधि. १८९७, |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फे पोउपनि. सत्यवान भुयारकर पोस्टे. गाडगेनगर अमरावती |
| घटनास्थळ | VMV कॉलेज समोर वलगाव रोड अमरावती |
| घटना ता. वेळ | २५/०७/.२०२० चे १९-०० वा |
| दाखल ता. वेळ | २५/०७/२०२० चे २२.०२ वा |
| आरोपी | १.गौरव रामेश्वर राऊत २) पुष्पक उदोराव विंचुरकर ३) अक्षय प्रकाशराव खडेकार ४) मयुर मोहन अनासाने |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालय अम. यांचा कक्ष -२७ /कलि/गृहविभाग/कवि-३७७/२०२० दि. ०६/०७/२०२० अन्वये कलम १४४(१)(२)(३) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता अन्वये संचारबंदी आदेश असतांना नमुद आरोपी हे त्यांना सदर बाबीची माहीती असुन सुध्दा अत्याआवश्यक कारणाशिवाय विनाकारण रस्तावर मोटारसायकल सह फिरतांना मिळुन आल्याने त्याचवर नमुद कलमान्वये गुन्हा दाखल करुन अशा फिर्यादी च्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. सत्यवान भुयारकर पोस्टे. गाडगेनगर अमरावती |

७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २४५/२०२० कलम ३२४,५०६(B),२९४,३४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | अब्दुल मोसीन अब्दुल रउफ वय २४ वर्ष रा. रोशन नगर गल्ली नं.१ अमरावती |
| घटनास्थळ | लालखडी चौक अमरावती. |
| घटना. ता .वेळ | दि.२५/०७/२०२० चे १४.०० वा दरम्यान |
| दाखल .ता. वेळ | दि.२५/०७/२०२० चे १६.३२ वा |
| आरोपी | १) शेख इमरान शेख इस्माईल वय २७ वर्ष २) शेख इरफान शेख इस्माईल वर्ष २५ दोन्ही रा. लालखडी अमरावती. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी नमुद फिर्यादी ला आरोपीतांनी फोन करुन फिर्यादीस त्याच्या राहत्या घरुन फोन करुन घटनास्थळी बोलावले व आरोपी क्रं २ यांने फिर्यादीस एकदम पकडले व आरोपी क्रं १ याने त्याच्या जवळील चाकु काढुन फिर्यादीचे डाव्या पायाच्या मांडीवर वार केले व आारोपीतांनी जिवे मारण्याची धमकी दिली व अश्लील शिवीगाळ केली, अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि अयुब शेख पोस्टे नागपुरी गेट अमरावती. |

८

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २४६/२०२० कलम ३०७,३४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | अल्ताफ खान अकरम खान वय २२ वर्ष धंदा - दुध विक्री रा. मौलाना आझाद कॉलणी अमरावती |
| घटनास्थळ | असोरीया पेट्रोलपंप अमरावती. |
| घटना. ता .वेळ | दि.२५/०७/२०२० चे १९.३० वा दरम्यान |
| दाखल .ता. वेळ | दि.२५/०७/२०२० चे २२.४६ वा |
| आरोपी | १) शेख फारुख शेख छोटु २) अब्दुल अलीम अब्दुल गणी दोन्ही रा. नुर नगर अमरावती. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा घटनास्थळी उभा असता यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी वर अचानक लोखंडी फरशा घेवुन हमला करुन फरशा ने फिर्यादी चे डोक्यावर फरशा मारुन जिव घेण्याचा प्रयत्न केला फिर्यादी चे डोक फुटुन रक्त निघाल्याने फिर्यादी ईर्विन दवाखाना येथे भरती झाल्याने त्याचे बयाना वरुन इंज्युरी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि अयुब शेख पोस्टे नागपुरी गेट अमरावती. |

९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २४७/२०२० कलम ३२४,१४३,१४७,१४९ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | शेख फारुख शेख छोटु वय २२वर्ष, धंदा - दुध डेअरी ,रा.नुर नगर नं.१ जावेद ए शाहबाचे बाजुला अम. |
| घटनास्थळ | असोरीया पेट्रोलंपप अमरावती. |
| घटना. ता .वेळ | दि.२५/०७/२०२० चे १९.३० वा ते १९.४५ वा दरम्यान |
| दाखल .ता. वेळ | दि.२५/०७/२०२० चे २३.०९ वा |
| आरोपी | १) सददाम २) सददाम चा भाऊ अल्ताफ ३) सोबत ३ ते ४ लोक सर्व रा. अमरावती. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रका रे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याचा मित्र घटनास्थळी उभे असता यातील आरोपीतांनी जुने दुश्मनी चे कारणावरुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व त्याचे मित्रावर अचानक हमला करुन आरोपी सददाम ने फिर्यादीस चाकु मारुन व इतर आरोपीतांनी लाठी काठी ने मारुन जखमी केले फिर्यादी चे रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि अयुब शेख पोस्टे नागपुरी गेट अमरावती. |

१०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | अप क्र २४४/२०२० कलम १८८ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | सर तर्फे राजेश सत्यनारायण पांडे ब.न ५२४ पो स्टे ना गेट अम शहर |
| घटनास्थळ | असोरीया पेट्रोलपंप समोर अमरावती |
| घटना ता .वेळ | २५/७/२०२० चे ९.३० वा |
| दाखल .ता. वेळ | २५/७/२०२० चे १२.०७ वा |
| आरोपी | मेहफुज अली सैय्यद मेहमुद वय ३० वर्ष रा छाया नगर अमरावती |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्या दी सर तर्फे राजेश सत्यनारायण पांडे ब.न ५२४ पो स्टे ना गेट अम शहर सर तर्फे राजेश सत्यनारायण पांडे ब.न ५२४ पो स्टे ना गेट अम शहर यांची दि .२५/७/२०२० रोजजी सकाळी ८ ते २१ वा पावेतो पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग ड्युटी असतांना ९/३० वा दरम्याण पो.स्टाफ सह पो स्टे हद्दीत शासकिय वाहनाने ` पेट्रोलीग करीत असतांना यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी याती ल आरोपी ने आपली समोसा कचोरीची नाश्ता विक्रीची हातगाडी लावुन नाश्ता विक्री करीत असतांना मिळुन आला महा.राज्यात कोरोना प्रसार थांबविण्यासाठी जिल्हाधिका री सा. अम यांनी जिल्हात जनता करफु जाहीर केला .मानवी जिवीतास त्यामुळे होणार संभाव्य धोका टाळण्याकरीता मा. पो.आयुक्त यांचे आदेषाने कलम १४४(१)(३) फोजदारी दंड प्रकिया संहिता प्रमाने जारी केलेल्या मनाई आदेशाबाबत माहीती करुन दिली असुन सुद्धा नमुद आरोपीने नाश्ताचे हातगाडी लावुन आदेशाचे उल्लंघन केले .त्याने केलेले कृत्य कलम कलम १८८ भादवी प्रमाने होत |

| | |
|---|---|
| | असल्याने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि महेश खुळे . पोस्टे नागपुरी गेट. |

११

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | ५२५/2020 कलम १८८,२६९,२७०,२७१,२९१ भादवी सहकलम ३,४ साथीचा रोग प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५१ (ब) आपत्ती व्यवस्थापन कायदा . |
| फिर्यादि नाव व पत्ता | वरिष्ठ पो.नि श्री आसाराम चोरमले सा. पो.स्टे वलगाव अमरावती शहर. |
| आरोपी | १) MH २७ AE ००८४ बजाज पल्सर चा चालक २) MH २७ BS ५३९७ बजाज पल्सर २२० चालक ३) MH २७ AJ १२४५ हिरोहोंडा पँशन चा चालक ४) MH २७ AG ०२२३ बजाज पल्सर चा चालक ५) MH २७ BH ५१०४ बजाज अँव्हीनजर ६) MH २७ BW ४३८४ बजाज मँक्सीमा लोडींग आँटो ७) व वरील वाहन चालकाचे अन्य मित्र |
| घटनास्थळ | ग्राम कांमुजा -वझरखेड दरम्यान पेढीनदीवर. |
| घटना.ता.वेळ | २५/०७/२०२० चे १६/०० वा. |
| दाखल ता.वेळ | २५/०७/२०२० चे १८/१८ वा. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी सोबत पो.स्टाफ असे कोरोना विषाणुच्या प्रादुर्भाव रोखण्याकरीता मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक कक्ष/२७/कली /गृह विभाग /कवि-३७७/२०२० दिनांक १६/०७/२०२० अन्वये दि.०१/०७/२०२० ते ३१/०७/२०२० पावेतो जा.फौ.१९७३ चे कलम १४४(१)(२)(३) अन्वये अमरावती शहरासंह संपुर्ण जिल्हायात संचारबंदी आदेश लागु असल्याने पो.स्टे वलगाव हद्दीतील ग्राम कांमुजा -वझरखेड पेढी नदी दरम्यान पेट्रोलींग करीत असताना यातील नमुद आरोपी वाहन चालक व त्याचे अन्य संवगळी हे पेढी नदीच्या पुलावर आपआपले वाहन उभे करुन खोल डोह असलेल्या पाण्यात उघड्या तोंडाने व अंगाने कोणतेही सामाजिक अंतर न ठेवता तोंडाला मास न लावता पाण्यामध्ये पोहताना मिळुन आले त्याना पाण्याचे बाहेर येण्याचे आव्हाहन केले असता यातील नमुद आरोपी हे घटनास्थळावरुन पसार झाले वरुन यातील आरोपी यानी संचाररबंदी आदेशाचे उल्लंघन केले वरुन यातील विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | ASI विजय दहातोंडे ब.न ६७५ पो.स्टे वलगाव अमरावती शहर. |

१२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | ५२६/२०२० कलम ३५४ (ड),३५४ (अ) (१) (ii) ,५०७,३४ भादवी . |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| आरोपी . | १) राजेश ज्ञानेश्वरराव शिंदे वय २७ वर्ष रा. धनगरपुरा वलगाव २)आकाश प्रमोद ढेवले वय २५ वर्षे रा. वलगाव ३) दिपक आकाश सांतंगे वय २९ वर्षे रा. वलगाव |
| ०घटनास्थळ | नया अकोला |
| घटना.ता.वेळ | २५/०७/२०२० चे १४/३५ वा. |
| दाखल ता.वेळ | २५/०७/२०२० चे १९/२० वा. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी याथील फिर्यादीची बहीण यानी तिचा मोबाईल हा दुरुस्ती करीता ग्राम वलगाव येथील जगदीश खरे यांचे कडे टाकला असता त्या मोबाईल मधील सिम चुकीने यातील आरोपी क्र. १ याचेकडे गेले असता त्यावरुन यातील फिर्यादीचा मोबाईल क्रमांक हा यातील आरोपीने घेतला व त्या मोबाईल क्रमांकावर आरोपी याने त्याचे मोबाईल क्रमांक वरुन फोन करुन फिर्यादीस अतिशय अश्लील भाषेत संभाषण करत होता नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.१ याने फिर्यादीचे मोबाईलवर फोन केला व वरील प्रमांणे संभाषण करीत असतांना त्याचे बाजुला असलेले आरोपी क्र. २ व ३ यानी सुद्धा आरोपी सोबत संगणमत करुन फिर्यादीस अश्लील भाषेत बोलले.अशा या बोलण्याने फिर्यादीस लाज वाटली व तिचे मनाला धक्का बसला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ASI विजय दहातोंडे ब.न ६७५ पो.स्टे वलगाव अमरावती शहर. |

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | ४९८/२०२० कलम १८८,२७१ भा.दं.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे पोना/१२२९ किशोर महाजन, पो स्टे राजापेठ, अमरावती शहर |
| घटनास्थळ | साईनगर, अमरावती |
| घटना ता. वेळ | दिनांक २४/०७/२०२० चे २३.०० वा. ते २३.३० वा. |
| दाखल ता. वेळ. | दिनांक २५/०७/२०२० चे ०२.५२ वा. |
| /आरोपी | १) रोशन विनायकराव रोहनकर वय ३० वर्ष, रा नवाथे नगर, अम.<br>२) प्रथमेश संजय कडु, वय २० वर्ष, रा गणेश कॉलनी, अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी मा.जिल्हाधिकारी, अम.यांचे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत बंदचा आदेश जारी असतांना नमुद आरोपी यांनी त्याच्य ताब्यातील मोटार सायकल यामाहा आर १५ क्र. एम एच ४९ ए वाय ५३५६ हिने काही कारण नसतांना फिरतांना मिळुन आले. त्यांच्या अशा फिरण्यामुळे कोरोणा सारख्या विषाणुचा संसर्ग होण्याची शक्यता दिसुन आली. मा.जिल्हाधिकारी सा यांचे आदेश क्र. कक्ष२७/कलि/गृह विभाग/१४४ आदेश/कवि-३७३/२०२० दिनांक ३०.०६.२०२० प्रमाणे आदेश जारी असतांना देखील सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसुन आल्याने त्यांचे कृत्य हे कलम १८८,२७१ भादंवि प्रमाणे होत असल्याने त्यांचेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पोना/१२२९ किशोर महाजन, पो स्टे राजापेठ, |

१४

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | ४९९/२०२० कलम १८८,२७१ भा.दं.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे पोना/१२२९ किशोर महाजन, पो स्टे राजापेठ, अमरावती शहर |
| घटनास्थळ | साईनगर, अमरावती |
| घटना ता. वेळ | दिनांक २४/०७/२०२० चे २३.३० वा. ते २४.०० वा. |
| दाखल ता. वेळ. | दिनांक २५/०७/२०२० चे ०३.०९ वा. |
| /आरोपी | १) शुभम प्रमोद करुले वय २२ वर्ष, रा सरोज कॉलनी, अम.<br>२) मयुर अनिल गुजर, वय २२ वर्ष, रा सरोज कॉलनी, अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी मा.जिल्हाधिकारी, अम.यांचे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत बंदचा आदेश जारी असतांना नमुद आरोपी यांनी त्याच्य ताब्यातील मोटार सायकल ॲक्टीव्हा क्र. एम एच २७ ए डब्लु ८५२२ हिने काही कारण नसतांना फिरतांना मिळुन आले. त्यांच्या अशा फिरण्यामुळे कोरोणा सारख्या विषाणुचा संसर्ग होण्याची शक्यता दिसुन आली. मा.जिल्हाधिकारी सा यांचे आदेश क्र. कक्ष२७/कलि/गृह विभाग/१४४ आदेश/कवि-३७३/२०२० दिनांक ३०.०६.२०२० प्रमाणे आदेश जारी असतांना देखील सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसुन आल्याने त्यांचे कृत्य हे कलम १८८,२७१ भादंवि प्रमाणे होत असल्याने त्यांचेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पोना/१२२९ किशोर महाजन, पो स्टे राजापेठ |

१५

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | ५०२/२०२० कलम १८८,२६९ भा.दं.वि.,सह कलम ५१(ब) राष्ट्रीय आपंत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम २,३,४ साथरोग प्रतीबंधक कायदा १८९७ |
| फिर्यादि नाव व पत्ता | सर तर्फे पो.उप.नि.के.बी.मापारी सा. पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |
| घटनास्थळ | .दुर्गामाता मंदीरजवळ बेलपुरा अमरावती |
| घटना ता. वेळ | दिनांक २५/०७/२०२० चे २०.३० वा. |
| दाखल ता. वेळ. | दिनांक २५/०७/२०२० चे २१.४६वा. |
| /आरोपी | १) विजय मानीकराव धनाडे वय ४२ रा.दुर्गामाता मंदीरजवळ बेलपुरा अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात | हकीकत अशा प्रकारे आहे की, मा.व.पो.नि.साहेब यांचे आदेशाने पो.स्टे.हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना |

| | |
|---|---|
| हकिकत | बेलपुरा येथील एक इसम कीराणा दुकान चालवीत आहे अशी गोपनीय माहीती मीळाली वरुन पंचासमक्ष नमुद घटनास्थळी पोहोचलो असता मा.जिल्हाधिकारी, अम.यांचे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत बंदचा आदेश जारी असतांना एक इसम त्याच्या ताब्यातील विजय कीराणा दुकान नावाचे दुकान चालु ठेवुन गी-हाईक करीत असतांना मीळुन आला त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव विजय मानीकराव धनाडे वय ४२ रा.दुर्गामाता मंदीरजवळ बेलपुरा अमरावती असे सांगीतले सदर इसमानस दुकान चालु ठेवण्याचे कारण विचारले असता त्याने समाधानकारक उत्तर दीले नाही शासनाने कोरोना संसर्गजन्य रोगाला आळा बसण्या करीता विवीध प्रसार माध्यमातुन आदेश पारीत केले असुन व.मा.जिल्हाधिकारी सा यांचे आदेश क्र. कक्ष२७/कलि/गृह विभाग/आदेश/कवि-३७७/२०२० दिनांक ०६.०७.२०२० प्रमाणे आदेश जारी असतांना देखील सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसुन आल्याने त्यांचे कृत्य हे कलम । १८८,२६९ भा.दं.वि.,सह कलम ५१(ब) राष्ट्रीय आपंत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम २,३,४ साथरोग प्रतीबंधक कायदा १८९७प्रमाणे होत असल्याने त्यांचेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पो.उप.नि.के.बी.मापारी सा. पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |

१६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६७९/२०२० कलम २९४, ५०९ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | उत्तमनगर गल्ली नं. ४, अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १२.१५ वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १९.०९ वा. |
| आरोपी | देवेद्र तुळशीराम इंगळे, वय ४० वर्ष, रा. उत्तम नगर गल्ली नं. ४, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे शेजारी राहत असुन आरोपी हा फि. चा घरासमोर नेहमी कचरा व माती टाकत असतो. यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या अंगणात माती टाकली तेव्हा फि. ची मुलगी हिने पाहिले व आरोपीला हटकले असता आरोपीने शिवीगाळ केली. वरुन फि. ने आरोपीस म्हटले कि, माझे घराचे समोर कचरा कशाला टाकता तेव्हा आरोपीने फि. सोबत विनाकारण भांडण करुन, अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

१७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८१/२०२० कलम २९४, ३२३,५०६ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | विनय उर्फ छोटु देविदास जामगडे , वय ३९ वर्ष, , धंदा मजुरी, रा. संजय गांधी नगर नं. २, जितु टॅक्सी गल्ली , अमरावती. |
| घटनास्थळ | संजय गांधी नगर नं. २, छोटु जामगडे यांचे राहते घरी, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १४.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १९.५८ वा. |
| आरोपी | राहुल बाबुलाल वानखडे, वय ३८ वर्ष, रा. संजय गांधी नगर नं. २, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील आरोपी व फिर्यादी हे एकमेकांना ओळखत असुन मागील एक वर्षापुर्वी ते दोघेही सोबतच कामाला जात होते. तेव्हापासुन आरोपी हा फिर्यादीच्या घरी नेहमी येणे जाणे करीत असतो. यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी आरोपीने दारु पिऊन फि. चे घरी जाऊन बडबड करु लागला. तेव्हा फि. ने आरोपीस समजावुन सांगीतले कि, माझ्या घरी पुजा चालु आहे. तु दारु पिऊन माझ्या घरी आला तु इथुन निघुन जा. तेव्हा आरोपीने फि. ला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फि. सोबत झोबाझोबी केली. व तो जमिनीवर पडुन जखमी झाला व मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८२/२०२० कलम २९४,५०६ भा. द. वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | उत्तमनगर गल्ली नं. ४, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे ११.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे २०.२७ वा. |
| आरोपी | दोन महिला |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे शेजारी राहत असुन शुल्क कारणावरुन आरोपी हे फि. सोबत भांडण करीत असतात. दि. २४.०७.२०२० चे रात्री ०८.०० वा दरम्यान फि. चे पती देवेंद्र इंगळे यांनी कुट्यातील पाणी काढून फेकल्याने आरोपीच्या गच्चीवर पडल्याने आरोपींनी फि. च्या पतीला शिवीगाळ केली होती. व त्यानंतर यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी दि. २४.७.२०२० रोजी रात्री ०८.०० वा. झालेल्या भांडणाच्या कारणावरुन आरोपीतांनी फि. ला अश्लिल भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेतला व फि. ला व फि. च्या पतीला मारल्या शिवाय राहणार नाही. अशी धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

१९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ६१९/२०२० कलम २९४, ५०६ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | रंगनाथ सारंगधर चोरमागे वय ६८ वर्ष रा भुमी रेसीडंन्सी नरेडी नगर जवळ गणेशपेठ अमरावती |
| घटनास्थळ | भुमी रेसीडेंन्सी नरेडी जवळ गणेशपेठ अमरावती |
| घटना ता. वेळ | २४.०७.२०२० चे १६.३० वा |
| दाखल ता. वेळ | २५.०७.२०२० चे ००.४३ वा |
| आरोपी | सोमेश्वर लक्ष्मणराव निंभोरकर वय ३८ वर्ष रा शारदा नगर अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांच्या रेसीडेंन्सी समोर विना परवानगी उभ्या राहलेल्या गाडयांची हवा सोडली असता यातील आरोपी हा तेथे आला व म्हणाला की तुम्ही माझ्या गाडीची हवा का सोडली या कारणावरून फिर्यादी यास आरोपीने अश्लिल शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि गणेश अहिरे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

२०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ६२०/२०२० कलम २९४, ५०६ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | सोमेश्वर लक्ष्मणराव निंभोरकर वय ३८ वर्ष रा शारदा नगर अमरावती |
| घटनास्थळ | भुमी रेसीडेंन्सी नरेडी जवळ गणेशपेठ अमरावती |
| घटना ता. वेळ | २४.०७.२०२० चे १५.०० वा |
| दाखल ता. वेळ | २५.०७.२०२० चे १५.१७ वा |
| आरोपी | रंगनाथ सारंगधर चोरमागे वय ६० वर्ष रा भुमी रेसीडंन्सी नरेडी नगर जवळ गणेशपेठ अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांची मोटर सायकल उभी केली असता यातील आरोपी याने ही पार्कींगची जागा माझी आहे असे म्हणुन फिर्यादी सोबत वाद करून त्यांना अश्लिल शिवीगाळ करून व तुया खोटा रिपोर्ट देवुन फसवितो अशी धमकी दिली. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | सपोनि मनिष वाकोडे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

**२१**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ६२१/२०२० कलम २९४, ५०६,५०४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | गजानन देवीदासराव केणे वय ४२ वर्ष रा. भिमनगर अमरावती |
| घटनास्थळ | शाळा न. १७ समोर,विलास नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | २५.०७.२०२० चे १९.०० वा |
| दाखल ता. वेळ | २५.०७.२०२० चे २०.३९ वा |
| आरोपी | अविनास पिपंळकर रा.मांडवा झोपडपट्टी अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी जात असता नमुद आरोपीने येवुन फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | सपोनि मनिष वाकोडे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

**२२**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | ५०१/२०२० कलम २९४,५०६(२),३४ भादंवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | जेवडनगर गल्ली क्र.१, अमरावती |
| घटना ता. वेळ | दिनांक २५/०७/२०२० चे १२.३० वा. |
| दाखल ता. वेळ. | दिनांक २५/०७/२०२० चे १४.५४ वा. |
| आरोपी | विलास वानखडे, रा जेवडनगर गल्ली क्र.१, अमरावती + १ अनोळखी इसम |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | थोडक्यात हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे गेटवर लाथांनी मारले व आरोपी क्र. १ चे हातात काहीतरी लोखंडी वस्तु होती ती तो गेटवर मारीत होता व फिर्यादीचे पतीला अश्लिल शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पोउपनि किसन मापारी, पो स्टे राजापेठ |

**प्रोव्हीशन रेड-१**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | ६८५/२०२० कलम ६५(फ) म. दा. का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.उपनि प्रकाश दगडुजी राठोड ब. नं. ५००, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती |
| घटनास्थळ | परिहारपुरा वडाळी, अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे १८.०० वा. दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि. २५.०७.२०२० चे २२.१५ वा. |
| आरोपी | प्रकाश दुर्योधन नायकवाड, वय ४५ वर्ष, रा. परिहारपुरा, अमरावती. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी यांची पो. स्टाफसह पो. स्टे. हद्दीत प्रो. रेड करणे कामी पेट्रोलींग असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायक माहितीवरुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता आरोपी गावठी हातभट्टी दारु विक्री करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन १० लि. गावठी हातभट्टी दारु डबकीसह कि. अं. १०००/- रु. चा माल पंचा समक्ष जागीच जप्त करण्यात आला त्यापैकी १८० एम . एल. काचेच्या शिशी मध्ये सी. ए. सँम्पल करीता काढून त्यावर फिर्यादीच्या , पंचाच्या व आरोपीच्या सहीचे लेबल लावून सिल करण्यात आले. उर्वरीत मुद्देमाल पंचा समक्ष घटनास्थळावर नाश करण्यात आला. सदर आरोपीचे कृत्य कलम ६५ (फ) म.दा. का. प्रमाणे होते. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म. पो. उपनि ज्योती बळेगावे, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती. |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | ५००/२०२० कलम ६५ (ई ) म.दा.का.सहकलम १८८,२६९ भादवि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे पोना/१०९६ फिरोज खान, पो. स्टे. राजापेठ |
| घटनास्थळ | गरिबनगर, भुतेश्वर चौक, अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२५/०७/२०२० चे १०.४५ वा. |
| दाखल ता. वेळ. | दि.२५/०७/२०२० चे १३.५० वा. |
| आरोपी | निरंजन प्रभाकर खडसे,वय ३२ वर्ष रा. गरिबनगर, भुतेश्वर चौक, अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीवर प्राप्त माहितीच्या आधारावर पंचासह प्रोव्ही रेड केला असता पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे एकुण १५ नग देशी दारु बॉबी संत्रा १८० एम.एल.च्या पावटया किं.अं.९००/- रु.चा प्रोव्ही.माल अवैधरित्या विक्री करीता घेवुन जात असतांता मिळुन आला वरुन सदर आरोपी हा कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखणेकामी मा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कवि-३७३/१४४/आदेश/२०२० दिनांक ३०.०६.२०२० रोजी जारी केलेल्या संचारबंदी आदेशाचे उल्लंघन करुन अवैधरित्या दारुची विक्री करीत असतांना मिळुन आला. करीता त्याचेवर कलम ६५ (ई) म.दा.का. सहकलम १८८,२६९ भादंवी प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पोना/१०९६ फिरोज खान, पो. स्टे. राजापेठ |

## अकस्मात मृत्यु-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग नं. 17/ 2020 कलम 174 जाफौ |
| फिर्यादी | सर तर्फे पो हवा अशोक बूंदेले बं न 893 पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |
| मृतकाचे नाव व पत्ता | दिनेश नामदेवराव पातुरकर वय ५०वर्ष रा छाया कॉंलनी अकोली पोस्टे खोलापुरी गेट अमरावती |
| घटानास्थळ | मालवीय चौक अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १६/७/२०२० चे ४.४० वा पुर्वी |
| मृत्यु ता.वेळ | दि २५/७/२०२० चे ७.४० वा |
| दाखल ता.वेळ | दि. २५/७/२०२० चे ११.५३ |
| मरणाचे कारण | इलाजा दरम्यान |
| मर्ग थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील मृतक हा मालवीय चौकअमरावती येथे बेशुध्द अवस्थेत पडलेला आहे अशी माहितीवरून त्यास स फौ ६४५ संजय देशमूख पोस्टेसिटी कोतवाली यांनी ईर्विन दवाखाना येथे उपचाराकरिता दि १६/७/२०२०चे ४/४० वा नेले असता एम औ सा यांनेत्याला दि २५/७/२०२०चे ७/४०वा मृत घोषीतकेले व त्याचा मरणाचा मेमो क्र २३२८ असा प्राप्त झाल्याने त्याचे प्रेत मर्च्यरी येथे ठेवण्यात आले आहे व मेमोवरून पोस्टेला मर्ग दाखल करून पुढील तपास कामी पोहवा अशोक बुंदेले बनं ८९३ सोबत पोका ४७१ असे रवाना झाले |
| तपासी अधिकारी | सफौ रविद्र काळे बं न ४९६पो स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

## २

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग नं. 18/ 2020 कलम 174 जाफौ |
| फिर्यादी | सर तर्फे पो हवा अशोक बूंदेले बं न 893 पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |
| मृतकाचे नाव व पत्ता | अनोळखी पूरूष वय अंदाजे ५५ |
| घटानास्थळ | मालवीय चौक पेट्रोल पंपचे बाजूला अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २५/७/२०२० चे ८.३० वा पुर्वी |
| मृत्यु ता.वेळ | दि २५/७/२०२० चे ८.३० वा पुर्वी |
| दाखल ता.वेळ | दि. २५/७/२०२० चे १२/०१ |
| मरणाचे कारण | समजून आले नाही |
| मर्ग थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील मृतक हा मालवीय चौक पेट्रोलपंपचे बाजूला अमरावती येथे बेशुध्द अवस्थेत पडला असून अशी माहितीवरून ईर्विन दवाखाना येथे उपचाराकरिता दि २५/७/२०२०चे ८/३० |

| | |
|---|---|
| | वा नेले असता एम ओ सा यांनी त्याला दि २५/७/२०२०चे ८/३०वा मृत घोषीतकेले व त्याचा मरणाचा मेमो क्र ९८८० असा प्राप्त झाल्याने त्याचे प्रेत मर्च्यरी येथे ठेवण्यात आले आहे व मेमोवरून पोस्टेला मर्ग दाखल करून पुढील तपास कामी पोहवा अशोक बुंदेले बनं ८९३ सोबत पोका ४७१ असे रवाना झाले |
| तपासी अधिकारी | सफौ रविद्र काळे बं न ४९६पो स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग नं. 42/ 2020 कलम 174 जाफौ |
| फिर्यादि | जिवन शामरावजी ख्ंडारकर वय २४ वर्ष, धंदा- शिक्षण रा. भवानीपुरा अंजनगांव बारी ता. अमरावती |
| मृतकाचे नाव व पत्ता | सचिन शामरावजी खंडारकर वय ३४ वर्ष अंजनगांव बारी ता. अमरावती |
| घटनास्थळ | अंजनगांवबारी टी पुलाचे खाली, अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २५/७/२०२० चे ०७.०० वा पुर्वी |
| मृत्यु ता.वेळ | दि २५/७/२०२० चे ८.३० वा पुर्वी |
| दाखल ता.वेळ | दि. २५/७/२०२० चे १०.५९ वा. |
| मरणाचे कारण | रेल्वे अपघाताने |
| मर्ग थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ताञ वेळी व ठिकाणी तक्रारदाराचा भाउ नामे सचिन खंडारकर हा आपले सायकलने रेल्वे क्रॉसिंग करीत असतांना त्याला मालगाडी रेल्वेने धक्का लागुन अपघात झाल्याने पुलाखाली सांडपाण्यात जाउन पडुन मरण पावला व त्याची सायकल समोरुन अपघात झाल्यासारखी दिसत आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन चौकशी घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. संजय आत्राम पो.स्टे. बडनेरा |